नवि १२

**विकास योजना -अंबरनाथ,कुळगाव-बदलापूर**
**आणि परिसर अधिसूचित क्षेत्र**
**सर्व्हे न.२०,हिस्सा नं.९ व सर्व्हे नं.२१,हिस्सा नं.३,**
**मौजे कुळगांव या जमिनीवरील ९.०० मी.रुंद विकास योजना रस्त्याबाबत.**

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(२) अन्वये मंजूर फेरबदल

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**

शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/३१५/प्र.क्र.१६२/०९/नवि-१२
निर्मल,२ रा मजला, मंत्रालय,मुंबई : ४०० ०३२,
दिनांक : ६ ऑगस्ट २०१२.

**शासन निर्णयः-** सोबतची शासकीय अधिसुचना (मराठी व इंग्रजी) महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(संजय वि.पवार )
**कार्यासन अधिकारी**

प्रति,

१) महानगर आयुक्त,मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा (पुर्व),मुंबई-५१.
२) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
३) संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) उपसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
५) जिल्हाधिकारी, जिल्हा ठाणे
६) सहायक संचालक नगर रचना, ठाणे शाखा, ठाणे .
(यांना विनंती की, मंजूर फेरबदल दर्शविणा-या भाग नकाशाच्या ५ प्रती अधिप्रमाणित करण्यासाठी शासनास उप संचालक नगर रचना,कोकण विभाग यांचे मार्फत सादर कराव्यात)
७) मुख्याधिकारी,कुळगांव-बदलापूर नगरपरिषद,बदलापूर.
८) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय,चर्नी रोड, मुंबई.
(त्यांना विनंती की, सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्राच्या भाग-१ कोकण विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करुन त्यांच्या प्रत्येकी ५ प्रती या विभागास, महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, उपसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई व मुख्याधिकारी, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद, बदलापूर यांना पाठवाव्यात.)
९) कक्ष अधिकारी, कार्यासन नवि-२९, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई त्यांना विनंती की, सदरहू अधिसुचना विभागाच्या वेब साईटवर प्रसिध्द करावी.
१०) निवडनस्ती (कार्यासन नवि-१२)

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय,मुंबई-४०००३२.**
**दिनांक:- ६ ऑगस्ट,२०१२.**

**अधिसुचना**

क्रमांक-टिपीएस-१२०८/३१५/प्र.क्र.१६२/०९/नवि-१२.

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**

ज्याअर्थी, अंबरनाथ,कुळंगाव-बदलापूर व परीसर अधिसुचित क्षेत्राची विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख "उक्त विकास योजना "असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम"असा करण्यात आला आहे) च्या कलम ३१ (१) अन्वये शासन नगर विकास विभागाची अधिसुचना क्रमांक टिपीएस-१२०४/९४१/प्र.क्र.१६३/०४/नवि-१२, दिनांक २५/७/२००५ (यापुढे जिचा उल्लेख "उक्त अधिसुचना" असा करण्यात आला आहे)अन्वये मंजूर झाली असून,ती दिनांक १२/८/२००५ पासून अंमलात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौ.कुळगांव येथील सं.नं.२०, हि.नं.९, स.नं.२१, हि.न.३ या जमिनीमधून ९.०० मी. रुंद विकास योजना रस्ता प्रस्तावित आहे(यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त रस्ता" असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (यापुढे ज्याचा उल्लेख" उक्त प्राधिकरण "असा करण्यात आला आहे )उक्त अधिनियमातील कलम ३७ (१) अन्वयेची सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन उक्त रस्ता वगळण्याचा व त्याखालील जमिन रहिवास विभागात समाविष्ट करण्याचा प्रस्ताव दिनांक ३०/५/२०११ च्या पत्रान्वये शासनाच्या मंजूरी करीता सादर केला आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त फेरबदल" असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअर्थी, आवश्यकती चौकशी केल्यानंतर व संचालक,नगर रचना,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर उक्त फेरबदल मंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे ;

आणि त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम ३७ चे पोटकलम (२) अन्वये शासनास प्रदत्त असलेल्या शक्तींचा वापर करुन शासन उक्त फेरबदल प्रस्ताव मंजूर करीत आहे आणि त्यासाठी उक्त विकास योजना मंजूरीच्या अधिसुचनेतील फेरबदलाच्या अनुसुचीमध्ये शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंद समाविष्ट करण्यात येत आहे;

नोंद

"अंबरनाथ,कुळगांव-बदलापूर व परीसर अधिसुचित क्षेत्राच्या मंजूर विकास योजने मधील मौ.कुळगांव येथील स.नं.२०, हि.न.९, स.नं..२१, हि.नं. ३ या जमिनीवरील ९.००मी. रुंद विकास योजना रस्ता वगळण्यात येत आहे व त्याखालील जमिन रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे."

टिपः-

अ)उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा नागरीकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी खाली नमूद कार्यालयामध्ये एक महिन्याच्या कालावधी करिता उपलब्ध राहील.

१) महानगर आयुक्त,मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,बांद्रा
२) उपसंचालक नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवीमुं बई.
३) सहाय्यक संचालक नगररचना,ठाणेशाखा,जि.ठाणे.
४) मुख्याधिकारी, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद, बदलापूर

ब) सदर फेरबदलाची अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या www.urban.maharashtra.gov.in वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(संजय वि.पवार)
का ासन अधिकारी

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
Urban Development Department
Mantralaya Mumbai 400032
Dated :- 6th August, 2012

## NOTIFICATION

No. TPS 1208/315/CR-162/09/UD-12

**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966**

Whereas, the Development Plan of Ambernath, kulgaon-Badlapur and surrounding Notified Area (hereinafter referred to as "the said Development Plan") has been sanctioned by the Government under Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") vide Urban Development Department's notification No. TPS-1204/941/CR-163/04/UD-12, date 25.7.2005 (hereinafter referred to as "the said Notification") to come in to force with effect from 12.8.2005;.

And whereas, in the said Development Plan an a 9.00 mtr. East West road is proposed on land bearing S. No. 20, Hissa No. 9, S.No. 21, Hissa No. 3 of village Kulgaon (hereinafter referred to as "the said Road").

And whereas, Mumbai Metropolitan Region Development Authority (hereinafter referred to as " the said Authority") after following all the legal procedure as per the provisions of Sub-section (1) of Section 37 of the said Act, has submitted proposal to Government vide letters dated 30.5.2011 so as to delete the said Road and to include the same in Residential Zone (hereinafter referred to as "the said Modification");

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune Government is of the opinion that the said modification proposal is necessary and should be sanctioned;

Now therefore, in exercise of the powers conferred under sub-section (2) of section 37 of the said Act, the Government of

Maharashtra hereby finally sanctions the said modification and for that purpose amends the said notification sanctioning the said Development Plan as follows;

In the schedule of modifications appended to the said notification sanctioning the said Development Plan, after the last entry following new entry shall be added viz :-

**ENTRY**

"The 9.00 mtr. East West D.P. Road on land bearing S.No. 20 Hissa No. 9, S.No. 21, HIssa No.3 of village Kulgaon from the Development Plan of Ambernath, Kulgaon-Badlapur and surrounding Notified Area, is deleted and area so deleted is included in Residential Zone "

**Note:-** A) The aforesaid part plan showing the sanctioned modification is available for inspection for the general public during office hours on all working days at the following offices for the period of one month..

1) The Metropolitan Commissioner, Mumbai Metropolitan Region Development Area, Bandra
2) The Deputy Director of Town Planning, Konkan Division, 3rd floor, Konkan Bhavan, Navi Mumbai 400614.
3) The Assistant Director, Town Planning, Thane Branch, Collector Campus, Thane
4) Chief Officer, Kulgoan Badlapur Municipal Corporation, Badlapur

B) This notification is also published on Government Web site at www.urban.maharashtra.gov.in

By order and in the name of Governor of Maharashtra.

(Sanjay V. Pawar)
Section Officer

D:\kalam\notification -162-kullgaon badala.docx